माहितीपत्रक

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी, पुणे -३५.

दुरध्वनी क्रमांक - (०२०)२७१६६०००, २७६५२९३४/३५
(विस्तारित क्रमांक १२०३)

ई निविदा सूचना क्रमांक गृह २ सन २०१८-२०१९

प्राधिकरणातील पेठ क्र. ४ मधील ८ दुकाने
निविदा पध्दतीने भाडेपट्टा तत्वावर वाटप करावयाच्या निविदेच्या अटी व शर्ती

दिनांकः- १०/०८/२०१८

**पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण**

नवीन प्रशासकीय इमारत, आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ, पुणे - ४११०३५.

दुरध्वनी क्र. : (०२०) २७१६६००० (विस्तारीत १२०३)

**ई-निविदा सुचना क्रमांक गृह-२ सन २०१८-१९**

प्राधिकरणातील पेठ क्र. ४ मधील ८ दुकानांचे भाडेपट्टा तत्वावर वाटप करण्याकरिता ई निविदा सूचना क्र. गृह-१ सन २०१८-२०१९ अन्वये निविदा मागविण्यात आल्या होत्या तथापि पुरेशा निविदा प्राप्त न झाल्याने प्राप्त निविदा फेटाळून माहिती पत्रकामध्ये नमूद केल्याप्रमाणे विहीत पात्रता धारण करणाऱ्या इच्छूक निविदाधारकांकडून मोहरबंद ऑनलाईन निविदा नव्याने मागविण्यात येत आहेत.

## दुकान वाटपासाठी ई-निविदा कार्यक्रम खालीलप्रमाणे

| अ. क्र. | तपशील | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | ऑन लाईन निविदा जाहिरात प्रसिद्धी दिनांक | १०/०८/२०१८ | सकाळी ११.०० वाजता |
| २. | निविदा Upload करण्याचा दिनांक | १३/०८/२०१८ | सकाळी ११.०० वाजता |
| ३. | निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक | ३०/०८/२०१८ | सायंकाळी ५.३० पर्यंत |
| ४. | निविदा उघडण्याचा दिनांक (तांत्रिक लिफाफा) | ०३/०९/२०१८ | सकाळी ११.०० वाजता |
| ५. | टिप क्र.१ : निविदा अर्ज शुल्क व बयाणा रक्कम फक्त नेट बँकींगद्वारे ई पेमेंट गेटवे मोडनेच स्विकारले जाईल. SB MOPS व इतर इंटरनेट बँकींगचा वापर करणाऱ्या निविदाधारकांनी ऑनलाईन पेमेंट चार दिवस आधी करावे. | | |

अ. ई - निविदाप्रक्रियेमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सर्व पात्र व्यक्तींनी ई-निविदा पोर्टल **"https://mahatenders.gov.in"** वर नोंदणी करणे सक्तीचे असून त्यांना लागू असणाऱ्या आवश्यक त्या प्रवर्गाच्या पॅनलवर स्वत:ची नोंदणी करून घेणे गरजेचे आहे.

ब. निविदाधारकांना ई निविदा भरताना अधिक तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास त्यांनी २४ X ७ टोल फ्री क्रमांक १८००-३०७०-२२३२ तसेच भ्रमणध्वनी क्र. ९१-७८७८००७९७२ किंवा ९१-७८७८००७९७९ वर संपर्क साधावा. तर दुकानाबाबत अधिक माहिती हवी असल्यास ०२० - २७६५२९३४/३५ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

क. सर्व निविदाधारकांनी निविदेसंबंधी सर्व कागदपत्रे ऑनलाईनच सादर करणे बंधनकारक आहे. पोस्टाने, अथवा व्यक्तीश: पाठविण्यात येणारी निविदा स्वीकारली जाणार नाही. निविदाधारकांकडून इतर मार्गाने प्राप्त झालेली निविदा उघडली जाणार नाही.

ड. कोणतेही कारण न देता एक अथवा सर्व निविदा नाकारण्याचा सर्वस्वी अधिकार प्राधिकरणाचा राहील.

इ. सदर निविदा सूचना सविस्तर अटी व शर्ती **https://mahatenders.gov.in** या पोर्टलवर व "**www.pcntda.org.in**" या संकेत स्थळावर पाहण्यास उपलब्ध आहेत.

**सही**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
पिं.चिं.न.वि.प्रा.,आकुर्डी
पुणे

## पेठ क्र. ४ येथील ८ दुकानांचे निविदा पध्दतीने ९९ वर्षांच्या भाडेपट्टा तत्वावर वाटप करण्याकरिता निविदेच्या अटी व शर्तीचे माहितीपत्रक

**(विशेष सूचना : सदर माहिती पत्रकातील निविदा अर्ज, अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचून निविदा अर्ज भरावा. नंतर याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.)**

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणातर्फे पेठ क्र. ४ मध्ये विकसित केलेल्या ८ दुकानांचे Online निविदा पद्धतीने ९९ वर्षांच्या भाडेपट्टा तत्वावर वाटप करण्यात येणार आहे.

वाटपासाठी प्रस्तावित असलेल्या दुकानांची, इच्छुक व्यक्तींनी समक्ष पाहणी करुन या दुकानांसाठी त्यांच्या सर्वात अधिकत्तम दरांची निविदा Online सादर करावयाची आहे. प्रस्तुत वाटप करावयाच्या दुकानांचा तपशिल खालील प्रमाणे आहे. दुकानांच्या स्थानाची माहिती सोबतच्या नकाशात दर्शविली आहे.

**१) पेठ क्र. ४ मध्ये वाटपासाठी उपलब्ध दुकानांचा तपशील**

| अ. क्र. | दुकान क्र. | क्षेत्रफळ Carpet Area चौ. मी. मध्ये | एकूण अधिमुल्य | निविदेसोबत भरावयाची रक्कम | आरक्षण | निविदा फार्म फी (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ | १५.६ | ३१,०८,०५० | ६२१६१/- | खुला | १०००/-- |
| २ | २ | १५.८ | ३१,४७,८९६ | ६२९५८/- | अनु. जाती SC | १०००/ |
| ३ | ३ | १५.८ | ३१,४७,८९६ | ६२९५८/- | खुला | १०००/ |
| ४ | ४ | १५.८ | ३१,४७,८९६ | ६२९५८/- | खुला | १०००/ |
| ५ | ५ | १५.८ | ३१,४७,८९६ | ६२९५८/- | खुला | १०००/ |
| ६ | ६ | १५.६ | ३१,०८,०५० | ६२,१६१/- | अनु. जमाती ST | १०००/ |
| ७ | ७ | १९.५ | ३८,८५,०६२ | ७७,७०१/- | खुला | १०००/ |
| ८ | ८ | १९.५ | ३८,८५,०६२ | ७७,७०१/- | अपंग | १०००/ |

**निविदा फॉर्म फीची रक्कम वरीलप्रमाणे असून ती परत केली जाणार नाही.**

## २. दुकानांचे आरक्षण :

नगर विकास विभागाकडील शासननिर्णय क्र. पीसीएम/२००९/१६०/प्र.क्र.९४/नवि-२२, दि. ०४/०९/२०११ नुसार प्राधिकरणाच्या सदनिका वाटपामध्ये मागासवर्गीय प्रवर्गासाठी पुढीलप्रमाणे आरक्षण ठेवण्यास शासनाची मान्यता देण्यात आलेली आहे.

| अ. क्र. | प्रवर्ग | दुकान वाटप योजनेतील आरक्षण |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती (नवबौद्धसह) (S.C.) | ११% |
| २ | अनुसूचित जमाती (S.T.) | ६% |
| ३ | विमुक्त जाती | १.५% |
| ४ | भटक्या जमाती | १.५% |

तसेच अपंग आरक्षण ३%

## ३. दुकानासह आरक्षण तपशील

| अ. क्र. | प्रवर्ग | दुकानावरील आरक्षण | दुकान क्र. |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती (नवबौद्धसह) (S.C.) | १ | २ |
| २ | अनुसूचित जमाती (S.T.) | १ | ६ |
| ३ | अपंग | १ | ८ |

## ४. निविदा सादर करण्याची पध्दत

पात्र निविदा धारकाकडून दुकानांचे भाडेतत्वाने वाटप करण्याकरिता ई - निविदा पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहेत. ही निविदा लिफाफा क्र. १ तांत्रिक लिफाफा व लिफाफा क्र. २ दराचा लिफाफा या पध्दतीने Upload करावी.

### अ) लिफाफा क्र. १ - तांत्रिक लिफाफा

तांत्रिक लिफाफ्यामध्ये खालील कागदपत्रांच्या स्कॅन केलेल्या प्रती जोडाव्यात.

१) परिशिष्ट - १ येथील विहीत नमुन्यातील अर्ज.

२) फॉर्म फी रुपये १००० व बयाना रक्कम भरल्याच्या Online Payment receipt ची स्कॅन कॉपी.

३) निविदाधारकाचे वय १८ वर्ष असल्याचा पुरावा म्हणून जन्माचा दाखल्याची किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्याची स्कॅन प्रत.

४) महाराष्ट्राचा रहिवासी असल्याबाबत अधिवास प्रमाणपत्र किंवा महाष्ट्रातील जन्मस्थळाच्या उल्लेखासह शाळा सोडल्याचा दाखला

किंवा

निविदाधारक पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातअर्जाच्या दिनांकापूर्वी सलग १ वर्ष कोणत्याही नोंदणीकृत कंपनी / संस्था / शासकीय / निमशासकीय कार्यालये / आस्थापनेमध्ये नोकरीस असल्याबाबत नियोक्त्याने दिलेला दाखला / प्रमाणपत्र.

५) निविदाधारक अथवा त्याच्या कुटुंबियाच्या नावे पिंपरी चिंचवड महानगरपालिका अथवा पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण क्षेत्रात १५ चौ. मी. पेक्षा जास्त क्षेत्रफळाचे दुकान / व्यावसायिक गाळा नसल्याबाबत परिशिष्ट ३ येथील नमुन्यात प्रतिज्ञापत्राची प्रत.

६) अनु जाती, अनु. जमाती प्रवर्गातून अर्ज करीत असल्यास जातीचे प्रमाणपत्र

७) अपंग प्रवर्गातून अर्ज करीत असल्यास जिल्हा शल्यचिकित्सांचे अथवा संबंधित वैयक्तीक मंडळाचे किमान ४०% अपंगत्वांच्या प्रमाणपत्राची प्रत.

८) पॅनकार्डची प्रत.

९) आधारकार्डची प्रत.

**ब) लिफाफा क्र. २ दराचा लिफाफा**

दराच्या लिफाफ्यात सोबत जोडलेल्या परिशिष्ट २ येथील नमुन्यात दरपत्रक भरुन सादर करावे.

## ५. पात्रता

दुकान वाटपासाठी खालील व्यक्ती पात्र असतील.

१. अर्ज सादर करावयाच्या दिवशी निविदाधारकाचे वय १८ वर्षांपेक्षा कमी नसावे. तसेच अर्ज करणारी व्यक्ती इंडियन कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट प्रमाणे करार करण्यास पात्र असली पाहिजे.

२. निविदाधारक, जन्माने महाराष्ट्राचा रहिवासी किंवा महाराष्ट्रातील किमान १० वर्षांच्या वास्तव्याने अधिवासी असला पाहीजे. या निकषासाठी,

- महसूल अधिकाऱ्यांमार्फत मिळणारा अधिवासाचा दाखला (Domicile Certificate) अथवा महाराष्ट्रातील जन्मस्थळाच्या उल्लेखासह शाळा सोडल्याचा दाखला.
- विवाहित स्त्री निविदाधारकाचे बाबत अधिवास दाखला किंवा महाराष्ट्रातील जन्मस्थळाच्या उल्लेखासह शाळा सोडल्याचा दाखल्याबरोबर सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले विवाह प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल. अथवा नावात बदलाबाबत शासन राजपत्र सादर करणे आवश्यक राहील.

किंवा

- निविदाधारक पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात अर्जाच्या दिनांकापूर्वी सलग १ वर्ष कोणत्याही नोंदणीकृत कंपनी / संस्था / शासकीय / निमशासकीय कार्यालये / आस्थापनेमध्ये नोकरीस असला पाहिजे. या पात्रतेबाबत सक्षम अधिकाऱ्याने दिलेला नोकरीचा दाखला आवश्यक राहील.

३. अनुसूचित जाती (नवबौद्ध सह)(S.C.), अनुसूचित जमाती (S.T.), या प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या दुकानासाठी निविदा भरीत असताना निविदाधारकाकडे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र उपलब्ध असणे आवश्यक आहे.

४. अपंग आरक्षणाचा लाभ घेवू इच्छिणाऱ्या अर्जदारांनी जिल्हा शल्यचिकीत्सकांचे अथवा संबंधित वैद्यकीय मंडळाचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र सादर करावे. अपंगत्वाचे प्रमाण किमान ४०% असणे आवश्यक आहे. ४०% पेक्षा कमी अपंगत्व असणाऱ्या अर्जदारांना अपंग आरक्षणाचा लाभ मिळणार नाही.

५. निविदाधारक अथवा त्यांची पत्नी / पती किंवा त्यांची अज्ञान मुले यांचे नावे मालकी तत्वावर भाडे खरेदी पध्दतीने अथवा नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थेचा सदस्य म्हणून पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत किंवा पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या हद्दीत १५ चौ. मी. पेक्षा जास्त क्षेत्रफळाचे दुकान / व्यावसायिक गाळा नसावा.

६. सार्वजनिक / निमसार्वजनिक प्राधिकरणे / सहकारी संस्था / सार्वजनिक किंवा खाजगी कंपन्या / भागिदारी संस्था अशा इच्छूक संस्थांनी सदर निविदा प्रक्रियेमध्ये सहभाग घेऊ नये.

७. यशस्वी लाभार्थींच्या यादीतील अर्जदारांची पात्रता निश्चित करण्याकरिता निविदाधारकांना अर्जात नमूद केलेल्या माहितीच्या पृष्ठयर्थ कागदोपत्री पुरावा सादर करणे आवश्यक राहील. अर्जाच्या दिनांकास अधिवास प्रमाणपत्र, जाती प्रमाणपत्र, व इतर आवश्यक ती प्रमाणपत्रे निविदाधारकाकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे. जात वैधता प्रमाणपत्र वगळता अर्जाच्या दिनांकानंतरची इतर प्रमाणपत्रे स्वीकारली जाणार नाहीत.

८. यशस्वी निविदाधारकाने अर्जात नमूद केलेल्या माहितीबाबत निविदाधारकाकडून मूळ कागदपत्रे घेवून त्यांची सविस्तरपणे छाननी करण्यात येऊन निविदाधारकाची पात्रता निश्चीत करण्यात येईल निविदाधारक मूळ कागदपत्रे सादर करु न शकल्यास त्यास अपात्र ठरविण्यात येईल.

## ६. निविदा सादर करण्याबाबत

१. दुकानांचे भाडेपट्टा तत्वावर वाटप करणेकरिता ई-निविदा पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहेत. ई-निविदा **(१) तांत्रिक लिफाफा** व **(२) वाणिज्य लिफाफा** या पद्धतीने अपलोड करावी.

२. सदर जाहिरातीमधील निविदेबाबतचा तपशील नमूद केलेल्या मुदतीत व वेळेमध्ये पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण कार्यालयाच्या संकेतस्थळावर **(www.pcntda.org.in)** पाहता येईल.

३. फॉर्म फी व बयाणा रक्कम e-payment gate-way mode द्वारे वेब साईटवरील सुचनेप्रमाणे जमा करावी.

४. निविदा अर्जात बिनचूक माहिती भरणे आवश्यक आहे. चुकीची वा अर्धवट माहिती भरल्यास व त्यामुळे निविदा ग्राह्य न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी निविदाधारकाची असेल.

५. आवश्यक तेथे आकडे अंकात व अक्षरात लिहावेत.

६. निविदा अर्ज भरण्यापूर्वी मागणी करावयाचे दुकान व त्याचा आजूबाजूचा परिसर, क्षेत्रफळ समक्ष पहावे. दुकान आहे त्या स्थितीत वाटप करावयाचे आहे. हे पाहूनच दर नमूद करावा. नंतर या संदर्भात कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

७. निविदाधारकाने आपला संपूर्ण पत्ता इमेल, भ्रमणध्वनी क्रमांक निविदेमध्ये लिहावा. या पत्त्यावर पाठविलेले पत्र निविदाधारकास मिळाले आहे, असे गृहीत धरण्यात येईल.

८. सर्व कागदपत्रे सुस्पष्ट दिसतील अशा पद्धतीने अपलोड करावीत.

९. एका व्यक्तीने एकापेक्षा अधिक दुकानांसाठी अर्ज करू नयेत. एका निविदाधारकाने एकच निविदा भरणे बंधनकारक आहे. एकापेक्षा जास्त निविदा आढळल्यास अशा निविदाधारकास अपात्र ठरविण्यात येईल.

१०. अनुसूचित जाती (नवबौद्ध सह)(S.C.), अनुसूचित जमाती (S.T.), या प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या दुकानासाठी निविदा भरीत असताना निविदाधारकाकडे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र उपलब्ध असणे आवश्यक आहे.

११. अपंग आरक्षणाचा लाभ घेवू इच्छिणाऱ्या अर्जदारांनी जिल्हा शल्यचिकीत्सकांचे अथवा संबंधित वैद्यकीय मंडळाचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र सादर करावे. अपंगत्वाचे प्रमाण किमान ४०% असणे आवश्यक आहे. ४०% पेक्षा कमी अपंगत्व असणाऱ्या अर्जदारांना अपंग आरक्षणाचा लाभ मिळणार नाही.

## ७. जागेचा व्यावसायिक वापर

अर्जदारास १) औषधाचे दुकान २) जनरल स्टोअर्स ३) किराणा ४) होजिअरी ५) कापड दुकान ६) बेकरी ७) चप्पल बूट विक्री दुकान ८) मिठाई दुकान ९) केशकर्तनालय १०) फुल पुजा साहित्य भांडार ११) गोदामे १२) रेशन दुकान १३) हॉटेल / अमृततुल्य १४) बँक कार्यालय १५) शासकीय / निमशासकीय अथवा सार्वजनिक संस्थेची कार्यालये १६) कन्सलटिंग रुम १७) संगणकीकरण संबंधित व्यवसाय १८) शालेय व क्रिडा साहित्य भांडार यापैकी १ व्यवसाय करता येईल.

निविदाधारकाने निविदेमध्ये कोणता व्यवसाय करणार आहे त्याचा उल्लेख करावा. निविदेमध्ये नमूद केलेल्या व्यवसायासाठीच दुकानाचा वापर करावा लागेल. अचानक तपासणीत या खेरीज अन्य प्रयोजनांसाठी दुकानांचा वापर केल्याचे निदर्शनास आल्यास कायदेशीर कारवाई करणेचा अधिकार पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण कार्यालयास राहील.

## ८. निविदा अर्ज उघडणे / स्विकृती व वाटपपत्र :

१. जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे निश्चित केलेल्या दिवशी प्राधिकरण ठरवेल त्या ठिकाणी उपस्थित निविदाधारकांसमक्ष अथवा प्राधिकृत प्रतिनिधींसमक्ष निविदा Online उघडण्यात येतील. प्राधिकृत प्रतिनिधीस निविदाधारकाने अधिकार पत्र देणे आवश्यक राहील. या दिवशी काही अपरिहार्य कारणामुळे / परिस्थितीमुळे निविदा उघडणे शक्य न झाल्यास उपस्थित निविदा भरणाऱ्यांना निविदा उघडणेबाबतचा दिनांक कळविणेत येईल. तसेच सदरचा दिनांक प्राधिकरणाचे वेबसाईटवर प्रसिध्द करणेत येईल.

२. प्रथम तांत्रिक लिफाफा (पात्रतेच्या कागदपत्रांचा) उघडण्यात येईल व यामध्ये निविदाधारकाने सर्व कागदपत्रे जोडली असतील व त्यानुसार निविदाधारक पात्र ठरत असेल तरच त्याची वाणिज्य लिफाफ्यामध्ये ठेवलेली दराची निविदा उघडण्यात येईल. तांत्रिक लिफाफ्यामधील पात्रतेची कागदपत्रे अपूर्ण असतील निविदाधारक अपात्र असेल तर वाणिज्य लिफाफा (दराचा लिफाफा ) उघडण्यात येणार नाही.

३. ज्या पात्र निविदाधारकाने दुकानासाठी जास्तीत जास्त किंमत देऊ केली असेल अशा निविदाधारकास यशस्वी निविदाधारक म्हणून घोषित करण्यात येईल. अशा रितीने सर्व दुकानासाठी यशस्वी निविदाधारक निवडण्यात येतील.

४. कोणत्याही निविदा अर्जात काही पूर्व अटींचा उल्लेख असल्यास असा निविदा अर्ज स्विकारला जाणार नाही.

५. निविदा उघडल्यानंतर ती कोणत्याही परिस्थितीत मागे घेता येणार नाही.

६. निविदेसोबत पात्रतेबाबत आवश्यक कागदपत्रे / पुरावे नसल्यास निविदा स्विकृती केली जाणार नाही.

७. संपुर्ण निविदा प्रक्रिया व वाटप हे प्राधिकरण सभेच्या मान्यतेस अधीन राहील.

८. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचा राहील.

९. प्राधिकरणाने ठरवून दिलेल्या दुकानाच्या एकूण किंमतीच्या २% रक्कम बयाणा रक्कम म्हणून भरावी लागणार आहे. या रक्कमेवर व्याज दिले जाणार नाही.

१०. सर्वात जास्त रक्कमेची पात्र निविदा सोडून इतर सर्व अपात्र निविदाधारकांची बयाणा रक्कम e-payment gate-way mode पद्धतीने विनाव्याज परत केली जाईल.

## ९. यशस्वी निविदाधारकाने दाखल करावयाच्या कागदपत्रांचा तपशील

निविदेमध्ये यशस्वी झालेल्या निविदाधारकांना पोस्टामार्फत (RPAD) पत्रे पाठविण्यात येतील. त्यानुसार यशस्वी झालेल्या निविदाधारकांना पात्रता निश्चित करण्यासाठी खालीलप्रमाणे मूळ कागदपत्रे विहीत कालावधीत सादर करावी लागतील.

१. निविदाधारकाने आपले वय अर्ज सादर केल्याच्या दिनांका रोजी १८ वर्षापेक्षा जास्त होते हे सिध्द करण्यासाठी जन्माचा दाखला/ शाळा सोडल्याचा दाखला/ जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडील प्रमाणपत्र सादर करावे.

२. निविदाधारक महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही भागामध्ये, किमान १० वर्षे सलग वास्तव्य करीत असल्याबाबतचे सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले महाराष्ट्रातील अधिवासाचे प्रमाणपत्र (Domicile Certificate) किंवा स्थानिक वास्तव्याचा दाखला किंवा महाराष्ट्रातील जन्मस्थळाच्या उल्लेखासह शाळा सोडल्याचा दाखला किंवा निविदाधारक पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात अर्जाच्या दिनांकापूर्वी सलग १ वर्ष कोणत्याही नोंदणीकृत कंपनी/संस्था/शासकीय/निमशासकीय कार्यालये/आस्थपनेमध्ये नोकरी करीत असल्याबाबत त्याच्या नियोक्त्याने/कार्यालय प्रमुखाने दिलेला नोकरीचा दाखला सादर करणे आवश्यक आहे.

३. निविदाधारकाचे किंवा त्यांच्या कुटुंबातील (कुटुंबाची व्याख्या - स्वत: , पती/पत्नी व अज्ञान मुले/ मुली) इतर व्यक्तीच्या मालकीचे पिंपरी चिंचवड नवनगर क्षेत्रात अथवा पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात १५ चौ. मी. पेक्षा जास्त क्षेत्रफळाचे दुकान नसल्याबाबत स्टॅम्प पेपरवर नोटराईज्ड प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे. याबाबतची माहिती चुकीची आढळल्यास यशस्वी निविदाधारकास कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरवून दुकानाचे वाटप रद्द करुन दुकानाचा ताबा काढून घेण्यात येईल.

४. निविदाधारकाने ज्या प्रवर्गातील राखीव गाळ्यांकरिता अर्ज केला आहे त्या प्रवर्गात मोडत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्राप्त केलेल्या दाखल्याची प्रमाणित प्रत सादर करावी.

५. निविदाधारकाने मागासवर्गीय प्रवर्गामध्ये अर्ज केला असल्यास त्या प्रवर्गात असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याकडून दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्राची प्रत सादर करणे आवश्यक राहील. **शासन निर्णयानुसार अनुसूचित जाती(SC), अनुसूचित जमाती(ST), या प्रवर्गातील यशस्वी अर्जदारांना सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र(Cast Validity Certificate) प्रथम सुचनापत्र दिल्यापासून ६ महिन्यात सादर करणे अनिवार्य राहील.**

**सदर जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय दुकानाचे वाटपपत्र व ताबा देण्यात येणार नाही निविदाधारक असे जात वैधता प्रमाणपत्र ६ महिन्याच्या कालावधीत सादर करु न शकल्यास त्यास अपात्र घोषित करण्यात येईल व त्या प्रवर्गातील इतर निविदाधारकांना संधी देण्यात येईल.**

६. अपंग आरक्षणाचा लाभ घेवू इच्छिणाऱ्या निविदाधारकांनी जिल्हा शल्यचिकीत्सकांचे/अपंगत्वाचे अथवा संबंधित वैदयकीय मंडळाचे प्रमाणपत्र सादर करावे. अपंगत्वाचे प्रमाण किमान ४०% असणे आवश्यक आहे. ४०% पेक्षा कमी अपंगत्व असणाऱ्या निविदाधारकांना अपंग आरक्षणाचा लाभ मिळणार नाही.

७. पॅनकार्ड व आधारकार्ड.

८. यशस्वी निविदाधारकाची पात्रता ठरविण्यासाठी वर नमुद केलेल्या कागद पत्रा व्यतिरिक्त आवश्यक असल्यास इतर कागदपत्रे उपलब्ध करण्याबाबत पत्राने कळविले जाईल. त्यानुसार निविदाधारकाने विहीत कालावधीमध्ये स्वत: प्राधिकरण कार्यालयामध्ये मूळ कागदपत्रासह येऊन कागदपत्रे जमा करणे, तपासून घेणे आवश्यक आहे. विहित कालावधीत कागदपत्रे सादर न केल्यास निविदाधारकास अपात्र ठरवण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

## .१०. दुकानांचे अधिमूल्य भरणा करावयाच्या अटी व शर्ती

१. प्राधिकरण कार्यालयास दुकानासाठी दर्शविण्यात आलेल्या विक्री किंमतीमध्ये वाढ करण्याचा अधिकार राहील.

२. सदनिकांकरिता विक्री किंमत भरण्याची पध्दत :-
यशस्वी निविदाधारकाची पात्रता निश्चित झाल्यावर दुकानाच्या किंमतीचा हप्ता निश्चित करुन त्याबाबत निविदाधारकास रजिस्टर पोस्टाने कळविण्यात येईल. दुकानाची किंमत पुढील वेळापत्रकानुसार भरावयाची आहे. वाटप पत्राच्या दिनांकापासून १५ दिवस टपाल कालावधी ग्राहय धरला जाईल.

अ. वाटपपत्र रजिस्टर पोस्टाने दिले जाणार असल्याने या पत्राच्या दिनांकापासून १५ दिवस सोडून त्यानंतरच्या २ महिन्याच्या कालावधीत अनामत रक्कम वजा जाता उर्वरित रक्कम पुढीलप्रमाणे २ टप्प्यात भरणा करावयाची आहे.

ब. पहिला टप्पा :- वाटपपत्राच्या टपाल कालावधीच्या दिनांकापासून १ महिन्याच्या आत उर्वरित रकमेपैकी १/२ रक्कम जमा करावी लागेल.

क. दुसरा टप्पा:- वाटपपत्राच्या टपाल कालावधीच्या दिनांकापासून २ महिन्याच्या आत पुढील १/२ रक्कम जमा करावी लागेल.

ड. दुकानाची किंमत विहीत मुदतीत अदा करणे शक्य नसेल तर किंमत भरण्यासाठी नमूद

केलेल्या विहीत कालावधीच्या आत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे मुदतवाढीसाठी अर्ज करता येईल. मुख्य कार्यकारी अधिकारी, PCNTDA यांना योग्य वाटल्यास PLR (Prime Lending Rate) प्रमाणे व्याजासहित मुदतवाढ जास्तीत जास्त ६० दिवसांपर्यंत देण्यात येईल. या ६० दिवसांच्या कालावधीकरीता एकूण किंमती पैकी अदा करावयाच्या रक्कमेवर PLR प्रमाणे व्याज आकारणी करण्यात येईल. हयानंतरही दुकानाची किंमत अदा करण्यात कसूर केल्यास सदनिका/दुकानाचे केलेले वाटप तात्काळ रद्द करण्यात येईल. व अनामत रक्कम जप्त केली जाईल.

३. निविदाधारकाने मागणी केल्यास कोणत्याही वित्तीय संस्थेकडून कर्ज प्राप्त होण्यासाठी मंडळाचे "ना हरकत प्रमाणपत्र" देण्यात येईल. त्याकरिता निविदाधारकाने "ना हरकत प्रमाणपत्र" मिळणेसाठी अर्ज करणे आवश्यक आहे.

४. यशस्वी निविदाधारकांनी अर्ज मागे घेतल्यास अर्जासोबत भरलेली अनामत रक्कम जप्त केली जाईल.

५. निविदाधारक निविदेमध्ये यशस्वी ठरल्यानंतर आवश्यक कागदपत्रांमध्ये त्रुटी असल्यास अथवा निविदाधारक अंतिमत: अपात्र ठरला तर त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

६. वाटपपत्र दिल्यानंतर कोणत्याही कारणास्तव निविदाधारकाने दुकान नाकारले किंवा कोणत्याही कारणास्तव वितरण रद्द करण्यात आल्यास निविदाधारकाने भरलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

## ११. दुकाने वितरणाच्या इतर महत्वाच्या अटी:-

१. दुकानांची विक्री किंमत तात्पुरती असून त्यामध्ये बद्दल झाल्यास बदललेली किंमत निविदाधारकास कळविण्यात येईल. अंतिम विक्री किंमत व जाहिरातीतील विक्री किंमत याचे फरकामुळे जर दुकानांच्या किंमतीत वाढ झाली. तर ती वाढीव रक्कम भरणे लाभार्थीवर बंधनकारक राहील.

२. यशस्वी निविदाधारकाने दुकानाचा ताबा मिळाल्यानंतर १ महिन्याच्या आत भाडेपट्टा करुन घेणे बंधनकारक राहील.

३. यशस्वी निविदाधारकांनी आवश्यक ती रक्कम भरुन व्यक्तिगतरित्या वीजपुरवठा, पाणीपुरवठा सुरु करुन घ्यावयाचा आहे.

४. महानगरपालिकेचे सर्व कर, पाणीपट्टी, मल:निस्सारण आकार, वीज आकार इ. त्या त्या स्थानिक ३ संस्थाकडे परस्पर भरावे लागतील.

५. या माहिती पुस्तकेत दिलेला तपशील परिपूर्ण नाही तो फक्त निदर्शक आहे. दुकानांच्या वितरणाच्या अटी व शर्ती, यशस्वी लाभार्थींना वेळोवेळी कार्यालयाद्वारे कळविल्या जातील व त्या लाभार्थींना बंधनकारक राहतील.

६. वाटप झालेल्या दुकानांच्या विक्री किंमतीवर महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार अधिक्षक मुद्राकं शुल्क कार्यालय यांचेकडे आवश्यक मुद्रांक शुल्काचा भरणा करावा लागेल. तसेच दुकानाचे आगाऊ वार्षिक सेवा शुल्क अदा करावे लागतील. शासनाच्या धोरणानुसार लाभार्थ्याने विकी किंमती व्यतिरिक्त इतर देय कर संबंधित कार्यालयाकडे भरणा करणे आवश्यक आहे. त्यानंतर दुकानाचा ताबा दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

७. यशस्वी निविदाधारकास भाडेपट्टयाच्या दिनांकानंतर दुकानाची ५ वर्षांच्या कालावधीपर्यंत विक्री करता येणार नाही. दुकानाची अनाधिकृत विक्री, हस्तांतरण झाल्याचे आढळून आल्यास संबंधित दुकान धारकाविरुध्द कायदेशीर कारवाई केली जाईल व दुकानाचे वाटप रद्द करुन दुकानाचा ताबा काढून घेतला जाईल.

८. यशस्वी व पात्र ठरलेल्या निविदाधारकाच्या कागदपत्रांची फेरतपासणी करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असून त्यामध्ये काही त्रुटी आढळल्यास अशा निविदाधारकास दुकानाचे केलेले वितरण रद्द करण्यात येईल.

९. शासनाच्या सुधारीत धोरणानुसार दुकानाच्या किमंतीवर लागणारा सेवा कर अथवा भविष्यात लागू होणारे इतर कर गाळेधारकांना भरावे लागतील

१०. अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे दुकानाचा व्यावसायिक वापर करण्याकरिता योग्य त्या खात्याची पूर्वपरवानगी घेणे ही जबाबदारी अर्जदाराची राहील.

११. निविदाधारकांनी दुकाने पाहून घ्यावीत व त्याबाबतची पूर्ण माहिती अर्ज करण्यापूर्वी करुन घ्यावी. त्याबाबतची तक्रार नंतर ऐकून घेतली जाणार नाही किंवा वाटपपत्र रद्द करता येणार नाही.

१२. दुकान घेणाऱ्यास महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ तसेच पिंपरी - चिंचवड महानगरपालिका यांचेकडे अनुक्रमे विजेच्या व पाण्याच्या मीटरसाठी डिपॉझिट द्यावे लागेल व विजेचा तसेच पाण्याचा पुरवठा आवश्यक तेथे स्वखर्चाने सुरु करुन घ्यावा लागेल. यासंबंधी येणारा अनुषंगिक खर्च अर्जदारास करावा लागेल. त्यासाठी या कार्यालयामार्फत NOC दिली जाईल.

१३. दुकानासाठी देय असणारे किंवा होणारे सर्व कर, उपकर व लेव्ही, शासकीय कर इ. ताबा मिळालेनंतर वेळोवेळी योग्य सरकारी, निमसरकारी तसेच स्थानिक प्राधिकृत कार्यालयात भरण्याची जबाबदारी अर्जदारावर राहील.

१४. व्यापारी इमारतीतील, स्वच्छतागृहे सामाईक वापराच्या जागा वगैरेची स्वच्छता, देखभाल, दुरुस्ती वगैरे बाबींची जबाबदारी त्या इमारतीतील सर्वांची राहील.

१५. निविदाधारकास प्राधिकरणाच्या लेखी पुर्वपरवानगीशिवाय दुकानामध्ये कसलाही फेरफार, दुरुस्ती, अगर वाढ अगर कोणत्याही प्रकारचा बांधकामाचा बदल करता येणार नाही. जर निविदाधारक दुकानदाराने एकदा वाटप केलेल्या जागेच्या बांधकामामध्ये बदल केल्यास अथवा जास्तीची जागा व्यापल्याचे आढळल्यास वाटप भाडेपट्टा रद्द करुन दुकान ताब्यात घेण्याचे अधिकार प्राधिकरणास राहतील.

१६. इतर नागरिकांना, दुकानदारांना कोणताही त्रास अथवा उपद्रव होईल अशा रितीने व्यवसाय सुरु करता येणार नाही.

१७. निविदाधारकाने त्यास कळविलेली पूर्ण रक्कम भरल्यानंतर प्राधिकरणाबरोबर करारनामा करावा लागेल या करारनाम्याचा तपशील प्राधिकरण ठरवेल त्यानुसार असेल. यासाठी येणारा टंकलेखन, स्टॅम्पडयुटी, नोंदणी फी, इ. अनुषंगिक सर्व खर्च अर्जदारास करावा लागेल.

१८. या योजनेतील दुकानांचा अनुज्ञेय व्यवसायापैकी एका व्यवसायासाठी वापर करण्यापूर्वी संबंधित व्यवसायासाठी आवश्यक असलेली अनुज्ञप्ती प्राप्त करण्याची जबाबदारी निविदाधारकावर राहील.

१९. जर दुकान हे कोणत्याही वर नमूद केलेल्या वापरासाठी उपयोगता आणता येणार असले तरी येथे ज्वालाग्राही पदार्थ तसेच दुकानास किंवा इमारतीस इजा होणारे पदार्थ यांचा तात्पुरता किंवा कायम किंवा कोणत्याही स्वरुपातील साठा किंवा विक्री करता येणार नाही. या अटीचा भंग

झाल्यास ताबडतोब कायदेशीर कारवाई होईल.

२०. निविदाधारकास अर्जात नमूद केलेला व्यवसाय स्वत:च सुरु करावा व चालू ठेवावा लागेल. इतर कोणासही पोटभाडयाने, कराराने किंवा अन्य कोणत्याही मार्गाने पूर्ण किंवा काही भाग चालविण्यास अगर वापरण्यास प्राधिकरणाचे लेखी पूर्वपरवानगी शिवाय देता येणार नाही व दुकान चालविण्यासंबंधी तसेच मालाचे साठवणीसंबंधी प्राधिकरण, महानगरपालिका, शासन किंवा प्राधिकृत कार्यालये यांनी केलेले नियम दुकानधारकांवर बंधनकारक राहतील.

२१. दुकान लाभार्थ्याने व्यवसायिक दुकानाचा जर कोणत्याही कारणाने वापर बदलावयाचा असेल तर त्यासाठी प्राधिकरणाची लेखी पूर्व अनुमती घेणे आवश्यक आहे. परस्पर वापर बदलू नये. अशी परवानगी प्राधिकरण वेळोवेळी ठरवेल त्या नियमानुसार व विहित रक्कम भरणा केल्यावर देण्यात येईल.

२२. भाडेपट्टयातील तरतुदीनुसार जमिनीचे लीजरेंट दरसाल रु. १ याप्रमाणे प्रत्येक वर्षाच्या ३१ मार्चपर्यंत प्राधिकरणाचे कार्यालयामध्ये भरावे लागेल.

२३. वरीलपैकी कोणत्याही अटीचा भंग केल्यास चुकीची माहिती दिल्यास कोणत्याही टप्प्यावर अथवा विक्रीनंतरही दुकानाचे वाटप
रद्द केले जाईल व प्राधिकरण दुकानाचा ताबा परत घेईल.

२४. नमूद केलेल्या अटी व नियमामध्ये कोणत्याही वेळी प्राधिकरणास योग्य वाटेल तो फेरबदल करणे, रद्द करणे, त्यात दुरुस्ती करणे किंवा नवीन अटी किंवा नियम यांचा समावेश करणे यांचे पूर्ण अधिकार प्राधिकरणास आहेत. हा अधिकार प्राधिकरण योग्य वाटेल त्यावेळी वापरु शकेल. अशारितीने बदलण्यात आलेले, रद्द केलेले, दुरुस्त केलेले तसेच नवीन केलेले नियम व अटी निविदाधारकावर बंधनकारक राहतील.

२५. या माहितीपत्रकात समाविष्ट नसलेल्या परंतु इतर आवश्यक बाबींसाठी शासनमान्य "डिस्पोझल ऑफ लँड रेग्युलेशनस् १९७३" मधील तरतुदी लागू आणि ग्राहय राहतील.

२६. या माहितीपत्रकातील नियम किंवा अटी यांचे अर्थबोधाबाबत काही वाद निर्माण झाल्यास त्याबाबतचा अंतिम निर्णय प्राधिकरणाचा राहील व तो निविदाधारकावर बंधनकारक राहील

२७. निविदाधारकाने भरलेली निविदा स्विकारणे अथवा नाकारणे याबाबत प्राधिकरण कार्यालयाचा निर्णय अंतिम राहील.

## सावधानतेचा इशारा

पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी, पुणे-३५. दुकान वाटपाच्या कोणत्याही कामासाठी, कोणालाही प्रतिनिधी / सल्ला देणार व प्रॉपर्टी एजंट म्हणून नेमलेले नाही. निविदाधारकांनी कोणत्याही अनधिकृत व्यक्तींशी परस्पर पैशांचा व्यवहार केल्यास त्याला पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी, जबाबदार राहणार नाहीत. तसेच निविदाधारकास कोणी दलाल / व्यक्ती परस्पर अर्ज विक्री किंवा प्राधिकरणाच्या नांवे पैसे उकळणे किंवा फसवणूक करणे इ. बाबी करतांना आढळल्यास या कार्यालयास पुढील दुरध्वनीवर कळवावे.

दुरध्वनी क्रमांक :- (०२०) २७१६६०००, २७६५२९३४/३५ (विस्तारित क्रमांक १२०३)

**सही**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,

आकुर्डी, पुणे - ३५.

# परिशिष्ट - १

## अर्जाचा नमुना

| निविदाधारकाचा फोटो |
|---|
| |

प्रति,

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण**

**आकुर्डी, पुणे.**

विषय :- पेठ क्र. ४ मधील दुकान वाटपाच्या निविदेबाबत.

संदर्भ :- निविदा क्र. गृह १ २०१७-१८ जाहिरात दि. ---------------

महोदय,

मी श्री. -------------------------------------------- रा. (पूर्ण पत्ता)------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------

---------- विषयाधीन निविदा जाहिरातीच्या अनुषंगाने ----------------- प्रवर्गासाठी राखीव असलेले दुकान क्र. ------------ खरेदी करण्यास इच्छुक असून मी या दुकानाचा ----------------- या व्यवसायासाठी वापर करीन. निविदेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. सोबत पुढील कागदपत्रे जोडत आहे.

१) परिशिष्ट - १ येथील विहीत नमुन्यातील अर्ज.

२) फॉर्म फी रुपये १००० भरल्याची Online Payment receipt ची प्रत.

३) बयाणा रक्कम भरल्याची Online Payment receipt ची प्रत.

४) निविदाधारकाचे वय १८ वर्ष असल्याचा पुरावा म्हणून जन्माचा दाखला किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्याची प्रत.

५) महाराष्ट्राचा रहिवासी असल्याबाबत अधिवासाचा दाखला किंवा महाष्ट्रातील जन्मस्थळाच्या उल्लेखासह शाळा सोडल्याचा दाखला.

किंवा

निविदाधारक पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातअर्जाच्या दिनांकापूर्वी सलग १ वर्ष कोणत्याही नोंदणीकृत कंपनी / संस्था / शासकीय / निमशासकीय कार्यालये / आस्थापनेमध्ये नोकरीस असल्याबाबत नियोक्त्याने दिलेला दाखला / प्रमाणपत्र.

६) निविदाधारक अथवा त्याच्या कुटुंबियाच्या नावे पिंपरी चिंचवड महानगरपालिका अथवा पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण क्षेत्रात १५ चौ. मी. पेक्षा जास्त क्षेत्रफळाचे दुकान नसल्याबाबतच्या परिशिष्ट ३ येथील नमुन्यात प्रतिज्ञापत्राची प्रत.

७) अनु जाती, अनु. जमाती प्रवर्गातून अर्ज करीत असल्यास जातीचे प्रमाणपत्र

८) अपंग प्रवर्गातून अर्ज करीत असल्यास जिल्हा शल्यचिकित्सांचे अथवा संबंधित वैद्यकीय मंडळाचे किमान ४०% च्या अपंगत्वांच्या प्रमाणपत्राची प्रत.

९) पॅनकार्डची प्रत.

१०) आधारकार्डची प्रत.

निविदाधारकाची स्वाक्षरी पूर्ण नाव

मोबाईल क्र. -

ई मेल -

पत्ता -

# परिशिष्ट - २

## लिफाफा क्र. २ निविदाधारकाने दुकानासाठी नमूद करावयाचा दर

| दुकान क्रमांक | क्षेत्र चौ. मी | प्राधिकरणाचा किमान दर | निविदाधारकाने देऊ केलेला जास्तीत जास्त दर (एकूण रक्कम) |
|---|---|---|---|
| | | | अंकात -<br><br>अक्षरात - |

निविदाधारकाची स्वाक्षरी :-

निविदाधारकाचे नाव :-

मोबाईल क्र. :-

ई मेल :-

# परिशिष्ट - ३

( सदरचे प्रतिज्ञापत्र रु. 100 च्या स्टॅम्प पेपरवर करणे (नॉन ज्युडीशियल) )

## प्रतिज्ञापत्र

मी---------------------------------------------------- वय--------धंदा------------ रा.----------------------------------------------------सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो / करते की मी किंवा माझ्या पत्नीच्या/ पतीच्या अगर माझ्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तीचे अगर कुटूंबातील कोणाही व्यक्तीचे नावाने पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण कार्यक्षेत्रात १५.०० चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्रफळाचे दुकान / व्यावसायिक गाळा नाही.

वरील सर्व माहिती माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरी व बरोबर आहे. सदरचे प्रतिज्ञापत्र मी प्राधिकरणाकडुन सदनिका/दुकान मिळण्यासाठी केले आहे. प्रतिज्ञापत्रातील माहिती खोटी आढळल्यास मला वाटप केलेले सदनिका/ दुकान रद्द होण्यास पात्र आहे. तसेच सदर मजकुर खोटा आढळुन आल्यास मी भारतीय दंड संहिता (आय.पी.सी.) चे कलम १९३ (२), १९९, २०० नुसार दंडास पात्र राहील.

सदर प्रतिज्ञापत्र आज दिनांक ---------------- रोजी केले असे.

| फोटो साक्षांकित करणे |
|---|

प्रतिज्ञापत्र करणार


SECTOR NO. 5 & 8
N
SECTOR NO. 6
SECTOR NO. 4
PROPOSED SITE
OF SHOPS
SPINE ROAD
SECTOR NO. 3